Special Ph.D. Entrance Test
Faculty: Commerce
Commerce

AGJ 1st half 1

**Con. 4963-12.** **KK–1222**

(3 Hours) **[ Total Marks : 100**

15th July. 2012

**विभाग १**

**सूचना** : **सर्व** प्रश्न **अनिवार्य** आहे.

All questions are **compulsory**

खालील प्रत्येक प्रश्नासाठी **चार** पर्याय दिलेले आहेत, त्यापैकी अचूक पर्यायाची निवड करा. **(40x1=40)**

१. शास्त्रीय व्यवस्थापनाचा जनक कोणास मानले जाते ?
   (अ) पीटर एफ् ड्रकर (क) एफ. डब्ल्यु. टेलर
   (ब) हेन्री गॅट (ड) डॉ. हेन्री फेयॉल

२. 'ऑन दि इकॉनॉमी ऑफ मशीनरी अॅन्ड मॅन्युफॅक्चरर्स' हा ग्रंथ कोणी लिहिला ?
   (अ) रॉबर्ट ओवेन (क) चार्ल्स बॅबेज
   (ब) हेन्री गॅट (ड) एफ्. डब्ल्यु टेलर

३. रॉबर्ट ओबेन कशाचा पुरस्कर्ता होता ?
   (अ) शास्त्रीय व्यवस्थापन (क) कामगार व्यवस्थापन
   (ब) सामान्य व्यवस्थापन (ड) मालकवर्ग व्यवस्थापन

४. हेन्री टाऊन यांच्या मते कामगारांना काय मिळाले पाहिजे ?
   (अ) योग्य मोबदला (क) कामाप्रमाणे दाम
   (ब) बोनस (ड) जादा नफ्यात सहभाग

५. मानवी कार्यप्रेरणा सिध्दांतामध्ये किती प्रमुख गरजा सांगितल्या आहेत ?
   (अ) ७ (क) ४
   (ब) ५ (ड) ३

६. 'उत्तेजक मजुरी योजना' कोणी मांडली ?
   (अ) डॉ. हेन्री फेयॉल (क) फ्रेडरिक हॅन्से
   (ब) पीटर ड्रकर (ड) यापैकी नाही

७. ———— चा अभ्यास करण्यासाठी हॉथॉर्न प्रयोग केला गेला ?
   (अ) मानवी संबंधा (क) तंत्रज्ञाना
   (ब) कामगारां (ड) यापैकी नाही

८. व्यवस्थापनाचे कार्य कोणते ?
   (अ) धोरण राबवणे (क) निर्णय घेणे
   (ब) ध्येय धोरण निश्चित करणे (ड) यापैकी नाही

९. मानवी कार्यप्रेरणा सिध्दांत कोणी मांडला ?
(अ) मॅस्लो (क) एल्टन मेयो
(ब) हर्झबर्ग (ड) इमर्सन

१०. व्यवस्थापन हे एक ————आहे.
(अ) शास्त्र (क) शास्त्र व कला संगम
(ब) कला (ड) व्यवसाय

११. वस्तू विकत घेण्याच्या इच्छेला कशाचे पाठबळ असल्यास तिला मागणी म्हणतात.
(अ) क्रयशक्ती (क) इच्छाशक्ती
(ब) उपलब्ध पुरवठा (ड) गरजा

१२. कोणत्याही उद्योगसंस्थेला कोणत्या वस्तूचे उत्पादन किती करावयाचे हा निर्णय कशावरून ठरतो ?
(अ) उद्योगसंस्थेची उपलब्ध बाजारपेठ (क) उत्पादक घटकांच्या किंमती
(ब) वस्तु पुरवठा (ड) वस्तूला असणाऱ्या मागणीतील बदल

१३. मागणी विश्लेषणाबाबत किती हेतू असू शकतात ?
(अ) अनेक (क) ठरावीक
(ब) दोन (ड) यापैकी नाही

१४. मानवी गरजा कशा असतात ?
(अ) पुर्ण होणाऱ्या (क) अमर्यादित
(ब) मर्यादित (ड) कधीतरी निर्माण होणाऱ्या

१५. आर्थिक प्रश्न कशामुळे निर्माण होतात ?
(अ) उपलब्ध साधन सामुग्री (क) मर्यादित साधने
(ब) अमर्याद गरजा (ड) अमर्यादित गरजा व मर्यादित साधने

१६. वस्तूच्या मागणीचे स्वरूप समजल्यास उत्पादक काय निर्णय घेतो ?
(अ) उत्पादनाच्या तंत्रातील बदल (क) वस्तूची किंमत कमी करणे
(ब) पुर्ण उत्पादन बदलणे (ड) उत्पादनाची गुणवत्ता बदलणे

१७. किमतीत वाढ झाल्याने मागणी कमी होणे या बदलाला मागणीचे काय म्हणतात ?
(अ) परिवर्तन (क) बदल
(ब) आकुंचन (ड) विस्तार

१८. आर्थिक प्रश्न साधन सामग्रीच्या कशावरून निर्माण होणारा प्रश्न असतो ?

(अ) साठा (क) दुर्मिळता

(ब) उपलब्धता (ड) उत्पादन

१९. बाजारातील प्राप्त किंमतीला कमी वस्तू घेणे म्हणजे ———— होय.

(अ) वस्तू उपयोगितेमधील घट (क) मागणी ऱ्हास

(ब) वस्तू दुर्मिळता (ड) मागणीतील बदल होय

२०. कमीत कमी किंमत असलेल्या वस्तूची मागणी ————असते.

(अ) लवचिक (क) एक असते

(ब) ताठर (ड) अलवचिक

२१. जर परिकल्पनेची ५% चाचणी पातळीला घेतली जात असेल आणि निरीक्षण केलेल्या परिणामाची संभाव्यता ५% पेक्षा कमी असेल, तर नमुना संख्या शास्त्र आणि गृहीत चल यांतील भिन्नता ————.

(अ) महत्वाची नसते (क) महत्वाची असते

(ब) अनिश्चित असते (ड) वरीलपैकी एकही नाही

२२. नमुना निवडीची विश्वसनीयता कशी निश्चित करता येईल ?

(अ) समांतर नमुना निवड करून

(ब) मुख्य नमुन्यापासून उपनमुन्याची निवड करून

(क) नमुना मापनाची राशींशी तुलना करून

(ड) वरील सर्व

२३. नमुना प्रमाद ————.

(अ) अभिनती (Bias) मुळे घडून येवू शकतो

(ब) अन्-अभिनती (unbias) मुळे घडून येवू शकतो

(क) अ आणि ब

(ड) वरीलपैकी एकही नाही

२४. पत्त्यांच्या जोडातून 'एक्का' काढण्याची संभाव्यता किती असेल ?

(अ) $\frac{१}{५२}$ (क) $\frac{३}{५२}$

(ब) $\frac{२}{५२}$ (ड) $\frac{४}{५२}$

२५. स्तरित नमुना निवड ही ———— नमुना होय.

(अ) गैरसंभाव्य नमुना (क) यादृच्छिक नमुना
(ब) संभाव्य नमुना (ड) ब आणि क

२६. भारतातील सहकारी बँकातून ————असते.

(अ) द्विस्तरीय रचना (क) चारस्तरीय रचना
(ब) त्रिस्तरीय रचना (ड) पाचस्तरीय रचना

२७. खालीलपैकी कोणत्या एका सार्वजनिक उद्योगात सर्वात मोठ्या प्रमाणात सार्वजनिक गुंतवणूक केली आहे ?

(अ) कापड (क) साखर
(ब) खते (ड) लोह व पोलाद

२८. औद्योगिक बँकाची संख्या राष्ट्रीय स्तरावर ———— आहे.

(अ) २ (क) ४
(ब) ३ (ड) ५

२९. रिझर्व्ह बँक पतपुरवठा शक्य करण्यासाठी ———— करते.

(अ) बँकरेट वाढविते (क) बाजार दर वाढविते
(ब) बँकरेट कमी करते (ड) यापैकी कोणतेही नाही

३०. नाफेड खालीलपैकी कशासी संबंधित आहे ?

(अ) शेतमाल विक्री (क) पशुसंवर्धन
(ब) शेती सुधारणा (ड) कुटीरोद्योगांना संरक्षण

३१. सार्वजनिक व खाजगी क्षेत्राबरोबरच कोणत्या समितीने संयुक्त क्षेत्राची शिफारस केली आहे ?

(अ) दंडवते (क) दत्त
(ब) चेलय्या (ड) गाडगीळ

३२. चक्रवर्ती समितीने चलन फुगवटा हेच भाववाढीचे एकमेव कारण आहे असे म्हटले आहे. त्यास जबाबदार घटक म्हणून कोणाचा उल्लेख केला आहे ?

(अ) चलन धोरण अभाव (क) जागतिक भाववाढीचे भारतातील आगमन
(ब) कृषी उत्पन्नातील चढ-उतार (ड) रिझर्व्ह बँकेचे शिथिल धोरण

३३. ————येथील परिषदेत सन १९४४ च्या जुलै महिन्यात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या स्थापनेची घोषणा केली.

(अ) ब्रेटनवुड्स (क) दर्बान
(ब) जोहान्सबर्ग (ड) व्हिएतनाम

३४. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना केव्हा झाली ?

(अ) १९४२ (क) १९४९
(ब) १९४५ (ड) १९५२

३५. अविकसित प्रदेशाचा जलद आर्थिक विकास साधण्यासाठी ————संस्थेची स्थापना झाली.

(अ) ए.डी.बी. (क) आय.बी.आर.डी.
(ब) आय.एम.एफ. (ड) यापैकी नाही

३६. आय. डी. ए. च्या स्थापनेच्या विचाराचा पाठपुरावा ————नी केला.

(अ) आयसेन हॉवर (क) एलिझाबेथ
(ब) जॉर्ज बुश (ड) यापैकी नाही

३७. भारतीय रूपयाचे पहिले अवमूल्यन ————साली झाले.

(अ) १९४९ (क) १९७०
(ब) १९६६ (ड) १९७७

३८. एशियन डेव्हलपमेंट बँकेत सर्वात आधिक भांडवल कोणाचे आहे ?

(अ) जर्मन (क) रशिया
(ब) जपान (ड) यापैकी नाही

३९. अवमूल्यनाचा तात्कालिक परिणाम ————.

(अ) व्यापार तूट वाढली (क) आयात कमी खर्चाची झाली
(ब) व्यापार शिलकीचा झाला (ड) आयात कमी झाली

४०. सुरुवातीच्या ३३ सदस्यांपैकी किती राष्ट्रे आशिया खंडातील होती ?

(अ) २० (क) १०
(ब) १५ (ड) ५

## विभाग २

(Attempt any **three** questions out of **five**)

खालीलपैकी कोणत्याही **तीनांवर** टिपा लिहा. **(3 x 10 = 30)**

(अ) कृतीयोजना व्यवस्थापन म्हणजे काय ? तिच्या अवस्था किंवा घटक स्पष्ट करा.

(ब) कृतीयोजनेच्या नियोजनात ध्येयवादी दूरदृष्ये आणि विशेष कार्ये यांची विधाने महत्वाची का असतात ?

(क) देशाच्या व्यवहारतोलात असंतुलन का निर्माण होते ? हे असंतुलन दुरुस्त करण्यासाठी कोणत्या पध्दती सामान्यपणे स्वीकारल्या आहेत ?

(ड) आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उद्दीष्टे व कार्ये स्पष्ट करा. तसेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने काय यश मिळविले आहे ? तसेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे टीकात्मक दृष्टिने टीपण करा.

(इ) शास्त्रीय संशोधनाच्या शास्त्रीय पध्दतीचे महत्त्व स्पष्ट करा.

## विभाग ३

(Attempt any **two** questions out of **four**)

खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. **(2 x 15 = 30)**

(अ) संशोधन नमुन्याच्या आराखड्यासाठी समस्या निश्चित करण्याच्या प्रक्रियेची सविस्तर चर्चा करा. समस्यांचा संशोधनासाठी उपयोग व त्यांचे महत्व स्पष्ट करा.

(ब) सामाजिक संशोधन करणारे संशोधनाशी संबंधीत कोणते मुलभूत प्रश्न उपस्थित करतात ? का ?

(क) 'आर्थिक एकत्रीकरण' म्हणजे काय ? आर्थिक एकत्रीकरण केल्यामुळे मिळणारे फायदे सांगा.

(ड) कृतीयोजनेच्या मूल्यमापनाचे आणि नियंत्रणाचे महत्व स्पष्ट करा. तसेच त्याच्या मर्यादा स्पष्ट करा.